माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.५८८९ / २३ /अ.क्र.८८१५ /२५

श्री.जीवन बापुराव वानखडे

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-१८)**
नगर विकास विभाग, मंत्रालय मुख्य इमारत, ४ था मजला
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-१८)**
नगर विकास विभाग, मंत्रालय मुख्य इमारत, ४ था मजला
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०३.२०२३ | १५.०६.२०२३ | -- | ०३.०८.२०२३ |

आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी श्री.जीवन वानखडे उपस्थित नाहीत. तथापि, त्यांनी सादर केलेल्या जोडपत्रामधील नमूद माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी स्तरावरच दि.१५.०६.२०२३ रोजी माहिती देण्यात आली असून त्यांचा अर्ज नगरपरिषद, तेल्हार येथे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित केला असल्याचे नमूद केले. ही कार्यवाही योग्य असल्याचे तत्कालिन अपिलिय अधिकारी तथा उप सचिव नगरविकास विभाग यांनी दि.०३.०८.२०२३ रोजीच्या आदेशात देखिल सुस्पष्टपणे नमूद केले आहे.

अपिलार्थीनी त्यांच्या अर्जामुळे महाराष्ट्र सरकार शासन आपल्या दारी योजनेंतर्गत वरील बेघर कुटूंबास रिकामी जागा उपलब्ध करुन देवून घरकुल देणेबाबत त्यांनी केलेल्या विनंती अर्जावर प्रत्यक्षात करण्यात आलेली कार्यवाही ही बाब अपेक्षित असून प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी दाखल केलेल्या जोडपत्रामध्ये मागितलेल्या माहितीचा अर्थबोधच होत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रथमत: स्पष्ट केले असून अपिलार्थींच्या विनंती अर्जात प्रत्यक्षात कार्यवाही अपेक्षित असून जन माहिती अधिकाऱ्यांकडून **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती दस्तऐवज स्वरुपात अपिलार्थींना पुरविणे अपेक्षित असून ही बाब जन माहिती अधिकारी

स्तरावर पूर्ण झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता तसेच अपिलिय अधिकाऱ्यांनीही या संदर्भात योग्य ते आदेश पारित केले असल्याने प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**

State Information Commission
Maharashtra